# राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,
## महाराष्ट्र राज्य, पुणे

रासनिप्रा

जुनी मध्यवर्ती इमारत, तळमजला, ५बी.जे.रोड, पुणे ४११००१.

फोन नं. - (०२०) २६०५०६४१ मेल आयडी - sceapune@gmail.com


जा.क्र.रासनिप्रा/ कक्ष- २ / हस्तपुस्तिका मध्ये दुरुस्ती / 3930 /सन२०२२ दिनांक १२/०४/२०२२

प्रति,

जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी ( सर्व )

तालुका/ प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी ( सर्व )

**विषय:-निवडणूक निर्णय अधिकारी हस्तपुस्तिका मधील दुरुस्तीबाबत..**

**संदर्भ** :- "अ", "ब", "क" व "ड" सहकारी संस्थांच्या निवडणूकाकरिता निवडणूक निर्णय अधिकारी/ प्राधिकृत अधिकारी यांचेसाठी प्राधिकरणाने प्रसिध्द केलेली मार्गदर्शक हस्तपुस्तिका

उपरोक्त विषय व संदर्भिय हस्तपुस्तिकेस अनुसरुन कळविण्यात येते की,

२/- राज्यातील "अ", "ब", "क" व "ड" सहकारी संस्थांच्या निवडणूकाकरिता निवडणूक निर्णय अधिकारी/ प्राधिकृत अधिकारी यांचेसाठी मार्गदर्शक हस्तपुस्तिकाचा प्रतीची छपाई करुन प्रधिकरणाने प्रसिध्द केलेली आहे. सदर मार्गदर्शक हस्तपुस्तिका छपाई नंतर काही नियमात बदल झालेले आहेत तसेच काही टाईप मध्ये चुका झालेल्या आहेत. त्यामुळे सदर दुरुस्ती खालील शुध्दीपत्रकाप्रमाणे करण्यात येत आहे.

-: शुध्दीपत्रक :-

| अ.क्र. | पृ. क्र. | हस्तपुस्तिकामधील सध्याची शब्द रचना | हस्तपुस्तिकामधील दुरुस्तीनंतरची शब्द रचना | |
|---|---|---|---|---|
| १ | ४ | <u>कलम ७३ क</u><br>निवडणूकीत महिला सदस्य निवडून आले नाही तर, त्या जागा महिला सदस्यातून स्विकृत ... | <u>कलम ७३ क</u><br>निवडणूकीत महिला सदस्य निवडून आले नाही तर, त्या जागा महिला सदस्यातून **नामनिर्देशनाने** ... | |
| २ | ७ | <u>कलम २७ पोटकलम (१अ)</u><br>जो क्रियाशिल सदस्य संस्थेच्या कामकाजात सहभागी होण्यात आणि उपविधीत नमुद केलेल्या किमान सेवांचा वापर करण्यास कसूर करील तो सदस्य क्रियाशिल असण्याचे बंद होईल आणि त्याला मतदानाचा हक्क असणार नाही. | दि. २८.०३.२०२२ रोजीच्या कायद्यामध्ये झालेल्या दुरुस्तीप्रमाणे सदरची तरतुद वगळणेत आलेले आहे | |
| ३ | २४ | <u>४.१</u><br>....अंतिम मतदार यादी प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून १० ते २० दिवसांच्या आत जाहीर करेल. | <u>४.१</u><br>....अंतिम मतदार यादी प्रसिध्द झाल्याच्या दिनांकानंतर ११ ते १९ दिवसांच्या आत जाहीर करेल. | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४ | ४२ | <u>९.६ क) मतदान अधिकारी क्र. ०३ व ०४:-</u><br>,... त्यानंतर मतदान अधिकारी क्रमांक ०३ व ०४ हे त्या मतदारास सर्वसाधारण, महिला राखीव व अनुसूचित जाती / जमाती या मतदार संघाच्या प्रत्येकी एक प्रमाणे एकुण ०३ मतपत्रिका... | <u>९.६ क) मतदान अधिकारी क्र. ०३ व ०४ :-</u><br>, ....त्यानंतर त्या मतदारास सर्वसाधारण, महिला राखीव , अनुसूचित जाती / जमाती , **विजाभज/ विमाप्र , इमाव** या मतदार संघाच्या प्रत्येकी एक प्रमाणे एकुण ०५ मतपत्रिका ..... | ( नियम ४३ प्रमाणे ) |
| ५ | ४५ | <u>९.९ मतदारास मतपत्रिका देणे ( नियम ४३ )</u><br>....मतदान अधिकारी क्र. ०२ व ०३ हे तो अनुक्रमांक मतपत्रिकेच्या काऊंटरवर विहित ठिकाणी ... | <u>९.९ मतदारास मतपत्रिका देणे ( नियम ४३ )</u><br>....मतदान अधिकारी क्र. ०२ व ०३ हे तो अनुक्रमांक या करिता स्वतंत्रपणे ठेवलेल्या मतदारांच्या यादीच्या प्रतीमध्ये मतदाराच्या नावासमोर ... | |
| ६ | ५२ | <u>१०.२(३)</u><br>...आणि त्या मतदान केंद्राच्या बाबतीत नियम ५४ मध्ये ठरवून दिलेल्या कार्यपध्दती अनुसरील. | <u>१०.२(३)</u><br>...आणि त्या मतदान केंद्राच्या बाबतीत नियम ५१ मध्ये ठरवून दिलेल्या कार्यपध्दती अनुसरील. | |
| ७ | ६७ | <u>२२. नैमित्तिक रिक्त जागा (नियम ७४)</u><br>निवडणूक निकालाच्या दिनांकापासून समितीचा कालावधी अडीच वर्षापेक्षा जास्त झालेला असल्यास नैमित्तिकपणे रिक्त झालेल्या पहिल्या कमाल २ जागा नामनिर्देशनाने भरण्याचे अधिकार संबंधित सहकारी संस्थेच्या संचालक मंडळास प्राप्त.<br>*निवडणूक निकालाच्या दिनांकापासून अडीच वर्षाच्या आत संचालक मंडळात नैमित्तिकपणे रिक्त झालेली जागा निवडणूकीद्वारे भरण्याची संस्थेस मुभा.<br>*नैमित्तिकपद कोणत्या तारखेस रिक्त झाले आहे ही बाब विचारात न घेता असे नैमित्तिक रिक्त पद भरतेवेळी समितीची मुदत ही अडीच वर्षापेक्षा जास्त झाली असल्यास ती नामनिर्देशन भरता येणार आहे.<br>* याबाबत प्राधिकरणाने जा.क्र. ७७५० दि. २६/१०/२०१८ व जा. क्र. ३४२८ दि. २८/०३/२०१९ अन्वये आदेश जारी केलेले आहेत. | <u>२२. नैमित्तिक रिक्त जागा (नियम ७४)</u><br>दि. १७.०२.२०२२ रोजीच्या अधिसुचनेद्वारे नियम ७४ मध्ये सुधारणा केलेप्रमाणे याबाबत प्राधिकरणाने जा.क्र. १९८४ दि. ०९/०३/२०२२ अन्वये आदेश जारी केलेले आहेत. | |
| ८ | ८६ | <u>नमुना ई-५</u><br>निशाणी निवडण्याबददलचे प्रतिज्ञापन | <u>नमुना ई-५</u><br>निशाणी निवडण्याबददलचे **प्रतिज्ञापत्र** | |

**मा. आयुक्त, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या मान्यतेने.**

(यशवंत गिरी) ०८/२२
सचिव,
राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

प्रत :- सहाय्यक प्रशासकीय अधिकारी / सह सहकारी निवडणूक आयुक्त ( सर्व)